टिळक महाराष्ट्र अभिमत विद्यापीठ, पुणे या संस्थेस पुणे येथे नवीन भौतिकोपचार महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत...

# महाराष्ट्र शासन

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**शासन निर्णय क्र.पीएसओ-२०१०/प्र.क्र.१९६/१०/शिक्षण-१,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दि.३० मे, २०१२**

वाचा:-१) कुलसचिव, टिळक महाराष्ट्र अभिमत विद्यापीठ, पुणे यांचा दि.१६.०६.२०१० चा प्रस्ताव

२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र. संवैशिवसं/टिमविपु/भौतिकोपचार/पदवी/अभ्यासक्रम/तपासणी/१-अ, दि.३०.११.२०१० व दि.२५.८.२०११

**शासन निर्णय:-**

टिळक महाराष्ट्र अभिमत विद्यापीठ, पुणे या अभिमत विद्यापीठाचा पुणे येथे भौतिकोपचार महाविद्यालय सुरु करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला असून सदर संस्थेची संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेमार्फत सक्षमता तपासणी करण्यात आली आहे. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांची शिफारस व त्यांनी नियुक्ती केलेल्या सक्षमता तपासणी समितीचे अभिप्राय विचारात घेवून त्यांनी नमुद केलेल्या त्रुटीं पुर्ततेच्या अधिनतेने तसेच खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

**<u>अटी व शर्ती:-</u>**

१) या महाविद्यालयाची भौतिकोपचार अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता ६० (साठ) इतकी राहील.

२) सदरहू संस्थेतील प्रवेश मा.सर्वोच्च न्यायालयाने टि.एम.ए.फाऊंडेशन विरुध्द् कर्नाटक शासन याचिका क्र.३१७/१९९३ या प्रकरणात दि.३१ ऑक्टोंबर, २००२ रोजी दिलेला निर्णय तसेच इस्लामिक ॲकडमी ऑफ एज्युकेशन विरुध्द् कर्नाटक शासन प्रकरण क्र.३५०/१९९३ या प्रकरणात दि.१४ ऑगष्ट, २००३ रोजी दिलेला निर्णय आणि पी.ए.इनामदार वि.महाराष्ट्र शासन प्र.क्र.५०४१/२००५, दि.१२.८.२००५ नुसार करावेत.

३) राज्य शासनाने भौतिकोपचार अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांबाबत वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

४) महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिटयुट (प्राव्हिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८) मधील तरतुदीचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

५) सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती वा अन्य स्वरुपाच्या कोणत्याही खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही, असे लेखी अभिवचन संस्थेने दिले पाहिजे.

६) शासकीय वैद्यकीय व तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत सदरहू संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

७) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी संस्थेच्या प्रस्तावात दर्शविलेल्या सर्व त्रुटींच्या पुर्ततेबाबत संस्थेने दिलेल्या हमीपत्रानुसार या त्रुटींची ३ महिन्यात पुर्तता करुन त्याबाबतचा अहवाल संचालकांना तसेच शासनास सादर करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

८) तसेच संस्थेने प्रस्तुत अभ्यासक्रमासाठी महाराष्ट्र राज्य भौतिकोपचार व व्यवसायोपचार परिषद, मुंबई यांची मान्यता घेणे आवश्यक राहील.

९) संस्थेने केंद्रशासनाचे व राज्यशासनाचे तसेच विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली यांच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

१०)तसेच ~~[illegible]~~ भौतिकोपचार अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या फी शुल्काची निश्चिती कार्यालयीन सचिव, शिक्षण शुल्क समिती, शासकीय तंत्र निकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पू) मुंबई करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

(प्रकाश इंदलकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोगय विज्ञान विद्यापीठ, नाशिक
प्रबंधक, महाराष्ट्र राज्य व्यावसायोपचार व भौतिकोपचार परिषद, सेंट जॉर्जेस रुग्णालय, सी. एस.टी.स्टेशनच्या पाठीमागे, मुंबई
कार्यालयीन सचिव, शिक्षण शुल्क व प्रवेश नियंत्रण समिती, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१
कुलगुरु, टिळक महाराष्ट्र अभिमत विद्यापीठ, विद्यापीठ भवन, मुकूंदनगर, गुलटेकडी, पुणे
अध्यक्ष, असोशिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ अनएडेड प्राव्हेट मेडीकल ॲंड डेंटर कॉलेजेस महाराष्ट्र, पोटमाळा, श्री.जी. हाऊस, ७५, मिंट रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१
मा.मंत्री (वै.शि.), मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (वै.शि.), मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
निवडनस्ती (शिक्षण-१)